# १ मे १९७८
# अत्याचार आणि दडपशाहीविरोधी दिन

( नुकत्याच स्थापन झालेल्या कामगार–कर्मचारी परिषदेतर्फे महाराष्ट्रात १ मे दिन हा दडपशाही व अत्याचाराविरोधी दिन म्हणून पाळण्यात आला. सभा. मोर्चे, निदर्शने, मेळावे, परिसंवाद घेण्यात आले. त्यापैकी काहीचे अहवाल खाली देत आहोत.)

## कोल्हापूरातील श्रमिक महिलांचे निदर्शन

स्त्रियांमधील बेकारी, भरमसाठ वाढणारी घरभाडी व समाजातील वाढती दारूबाजी व व्यसनाधीनता याविरुद्ध निषेध प्रगट करण्यासाठी कामगार, शेतमजूर, शिक्षिका व अन्य मध्यमवर्गीय बुद्धीजीवी श्रमिक महिला व गृहीणी अशा कोल्हापूरातील सुमारे दीडशे स्त्रियांची एक मिरवणूक नुकत्याच स्थापन झालेल्या पक्षनिरपेक्ष श्रमिक महिला संघटनेतर्फे आज काढण्यात आली होती. " काम मागणाऱ्या प्रत्येक स्त्रीला काम मिळाले पाहिजे. " " समान कामाला समान वेतन " " गरीबांसाठी स्वस्त भाडयाची घरे बांधा " श्रमिकांचे संसार उध्वस्त करणारे दारु, पटका, जुगार बंद झाले पाहिजेत. " श्रमिकांच्या चळवळीवरील हल्ले व अत्याचारांचा धिक्कार असो. " अशा घोषणा देत ही मिरवणूक मुख्य रस्त्याने फिरून बिंदुचौकात आली. तेथे प्राथमिक शिक्षिका श्रीमती यमुताई लेले यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. सभेत श्रीमती तेरवाडकर, श्रीमती इंदुबाई सावंत व श्रीमती विमलाबाई बागल यांची भाषणे झाली. वक्त्यांनी आपल्या भाषणात व्यसनाधीनता, घरभाड्याचा प्रश्न व स्त्रियांची बेकारी या प्रश्नासंबंधी स्त्रियांची दुस्थिती वर्णन करून सांगत असता आपल्या हक्कांकरीता झगडण्याचे त्यांनी आवाहन केले. आपल्या व्यवसायांत श्रमिक महिलांनी आपले व्यवसायिक प्रश्न सोडवून घेण्याकरिता प्रयत्न करीत असतानाच त्या त्या व्यवसायातील कामगारवर्गाची चळवळ बळकट करण्यास आवाहन केले व त्याचप्रमाण कामगार चळवळीनेही स्त्री–मुक्ती चळवळ बळकट करण्यास सहाय्यभूत व्हावे असे आवाहन केले. अध्यक्षांनी समारोपाच्या भाषणांत बिंदू चौकात उपोषणास बसलेल्या अॅप्रेंटीस कामगारांच्या मागण्यांनाही पाठिंबा जाहीर केला.

## पुण्यातील श्रमिक दलित कामगार स्त्री–पुरुषांचे निदर्शन

पुणे महानगरपालिका कामगार युनियन व सर्व श्रमिक संघटनेचे वतीने एक मिरवणूक संघटित केली होती: ५०० च्या संख्येने सफाईसेविका व ३०० पुरुष यात सामील झाले होते. मंडईतील फुले यांचे पुतळ्यापासून ही मिरवणूक निघाली. पंतनगर, बेलादिल्ला, कानपूर वगैरे ठिकाणच्या कामगार शेतमजूर स्त्री पुरुषांवरील हल्ल्यांचा, गोळीबाराचा निषेध करणाऱ्या घोषणा दिल्या जात होत्या. गंजपेठमधील एका कॉलनीचे आवारात सभा झाली. सभेमध्ये अनेक दलित व इतर कार्यकर्त्यांना वरील अत्याचारांची माहिती देऊन पुढील काळात कार्यकर्त्यांना एकजुटीने या हक्कांना तोंड देण्यासाठी कशी संघटित ताकद उभी केली पाहिजे याची आवश्यकता समजून दिली.

## कासारवाडी महिला आघाडीचा १ मे दिन

कासारवाडी महिला आघाडीच्या वतीने पिंपरी येथे आर्य समाज मंदीरात १ मे दिन साजरा करायचे ठरविले. तशा प्रकारची निमंत्रण पत्रके छापली. पिंपरी, आकुर्डी, मोरवाडी, चिंचवड, कासारवाडी इ. ठिकाणी ती वाटली. मात्र मनात शंका होती कामगारदिन साजरा करण्यास महिला येतील किंवा नाही.

जसा जसा मे दिन जवळ येत चालला तसतशी कार्यक्रमाची तयारी जोरात चालू झाली. ठीक ५॥ वाजता कार्यक्रमास सुरवात झाली. निरनिराळ्या विभागातील सुमारे २०० ते २५० महिला या कार्यक्रमास उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरवात "उठाव झेंडा बंडाच्या" या गाण्याने झाली. हे गाणे मंगल सरीन व ज्योती जाधव याना म्हटले. या नतर सौ. ढवणे यानी कथा वाचन तर सौ. बनारसे बाईंनी रशियन कामगार बाबुश्कीनचा इतिहास सांगितला. सौ. बाळुताई वाघमारे यांनी 'बायजा'त आलेली 'सोहोगी'ची कहाणी झणझणीत भाषेत सांगीतली तर सौ. सपकाळ यांनी सोलापूर येथील कम्यूनचा इतिहास सांगितला. तसेच सौ. सपकाळ व सौ. जयवंता तांबे यांनी चासनला खाण आपघातावरील एकांकिका सादर केली. सौ. सुशीला तांबे यांनी बायकांच्या खुळचा समजुती, अंधश्रद्धा, व्रत वैकल्ये यावर टिकात्मक भाषण केले.

शेकटी मंगला सरीन यांनी १ मे हा कामगार लढ्याचा केवळ स्मृतीदिन म्हणून सजरा न करता समाजातील प्रत्येक छीटचा मोठचा अन्यायाविरुद्ध झगडले पाहिजे असे सांगितले.

बायका उत्सुकतेने कार्यक्रम ऐकत होत्या. एकंदरीत या कार्यक्रमाचे तीन तास कोठे गेले हे कळलेच नाही उलट मिळेल त्या जागेत ताटकळत उभे राहून पुरूषांनी देखील हा कार्यक्रम ऐकला व असे कार्यक्रम वारंवार घडावेत असे काही लोकांनी सांगितले.

कार्यक्रमाची समाप्ती सर्व महिलांना आवाहनात्मक अशा "या देशाच्या बायांना आया बहीणींना सांगाया जायाचे हाय ग" या गाण्याने झाली. □

---

(पान १४ वरून)

बिसरावे असा उपदेश केला. परंतु ओमप्रकाशचा ठामपणा पाहून तो ऑफीसर म्हणाला. 'तुला मी का मदत करायची? लग्नासाठी तू माझी परवानगी घेतली होतीस?'

ओमप्रकाश पाटण्यास मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर आणि इतरांना भेटला. त्यावेळी त्याचा चेहरा माराने सुजला होता. त्या सर्वांनी त्याला व त्याच्या पत्नीला एकत्र आणण्याचे आश्वासन दिले. परंतु अद्याप प्रत्यक्षात काहीच घडले नाही. उलट मुलीचे पूर्वीच लग्न झाले आहे त्यामुळे हे दुसरे लग्न बेकायदेशीर आहे असे सिद्ध करण्याचे गावकऱ्यांचे प्रयत्न चालू आहेत. हा सर्व कट आहे, जनता आमदार सुद्धा यामागे आहेत असे कळले आहे असे ओमप्रकाशचे म्हणणे आहे. ही सर्व मंडळी तथाकथित उच्चवर्णीय आहेत.

उर्मिलेच्या भावासहित सर्व हरिजनांना अशी धमकी देण्यात आली आहे की त्यांनी जर या जोडप्याच्या बाजूने काही सांगितले तर त्याचे परिणाम फार वाईट होतील. या तरुणाला असे वाटते की अस्पृश्य मंडळी त्याच्या विरुद्ध नाहीत पण परिस्थितीने त्यांना तटस्थ रहाण्यास भाग पाडले आहे. या लग्नाबद्दल माहिती असताना सुद्धा त्याचे वडील आशीर्वाद देण्यासाठी आले नाहीत. त्याची आई व इतर नातेवाईकही गप्प आहेत. ते जर माझ्या बाजूने बोलले तर त्यांना माझ्याप्रमाणेच गावाबाहेर हाकलले जाईल असे ओमप्रकाशला वाटते.

संबंधित कागदपत्र घेऊन ओमप्रकाश परत पाटण्याला आला आहे. पण त्याला उर्मिलेची काळजी वाटते आहे. "तिला कशी वागणूक मिळते आहे कोणास ठाऊक? ते सर्वजण तिच्यावर तिने लग्न नाकारावे म्हणून सक्ती करण्याचा प्रयत्न करत असतील. पण उर्मिला माझ्यापेक्षाही खंबीर आहे. ती बदलणार नाही. आज सर्वजण जरी त्याच्या विरूद्ध असले तरी त्याला विश्वास वाटतो. त्यानाच शरण यावे लागेल. मला नाही" पण त्याला द्याव्या लागणाऱ्या झगड्यावरून हेच सिद्ध होते की अन्याय्य परंपरा मोडणे किती अवघड आहे. एकीकडे बिहार सरकार हरिजन पंधरवडा साजरा करत असताना बिहारमध्ये वरिष्ठ वर्गीय सरंजामी जमीनदारांकडून कितीतरी हरिजन मारले जाताहेत!
( २१।७।७७—टाईम्स ऑफ इंडिया )